# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१) ७७२८ (०६-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जुलै व ऑगस्ट, २०१४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत सुमारे २०० जणांचा मृत्यु झाल्याचे व धुळे तालुक्यात संततधार पावसामुळे ३४७ गुरे ठार तर घराची भिंत पडून एकाचा मृत्यू झाल्याचे तसेच विदर्भात माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत वीज कोसळून १० जणांचा मृत्यू तर २१ जण जखमी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेत मृत झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना व गुरांच्या मालकांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या अनुषंगाने मृतकांच्या वारसदारांना व जखमींना प्रदेय असणाऱ्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०५-२०१७) :** (१) राज्यात माहे जुलै ते ऑगस्ट, २०१४ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, वीज कोसळून सुमारे ३१४ व्यक्ती मृत झाल्या आहेत. तसेच लहान मोठी एकूण ६४९ जनावरे मृत झाली आहेत. त्यामध्ये धुळे तालुक्यातील लहान मोठी एकूण २१४ जनावरांचा समावेश आहे.

विदर्भात जून ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीत वीज कोसळून ७४ व्यक्ती मृत झाल्या असून ५० व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

(२) दिनांक ३० जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर कालावधीत मृत झालेल्या पात्र मृतांच्या कुटूंबियांना व गुरांच्या मालकांना आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा (ता.जि.बुलढाणा) येथील उपवनसंरक्षक कार्यालयाच्या खाली,**
**हिंदु स्मशानभूमीच्या जवळ तलावाचे बांधकाम करणेबाबत**

**(२) १४२०५ (०८-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा (ता.जि.बुलढाणा) येथील उपवनसंरक्षक कार्यालयाच्या हिंदु स्मशानभूमीच्या जवळ ब्रिटिशकालीन तलाव पावसाळयात मोठया प्रमाणात वाहून जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावाच्या खालच्या बाजुस माळविहिर, सुंदरखेड ह्या गावांमधून नाला वाहत असून, ब्रिटिश कालीन तलावाचे अतिरिक्त वाहुन जाणारे पाणी व नाल्याच्या पाण्यावर तलावाचे सर्वेक्षण करुन बांधकाम करण्याची मागणी माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान तत्कालीन लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन व जलसंधारण विभाग, बुलढाणा यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०७-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तत्कालीन लोकप्रतिनिधीनी दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी पत्र दिले आहे.

(३) प्राथमिक स्थळ पाहणी केल्यानुसार सूचित केलेले स्थळ हे वनजमिनीत येत असल्याने अधिक्षक, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती यांचेकडून सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

---

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे बँक खाते नसल्यामुळे दुष्काळ निधी वाटपाला खीळ बसल्याबाबत**

**(३) २८२६५ (१५-१२-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गत वर्षाच्या तब्बल २६ लाख दुष्काळग्रस्त शेतकरी खरीप हंगामातील मदतीपासून अद्यापही वंचित असून, संबंधित शेतकऱ्यांचे बँकेत खाते नसल्याने दुष्काळी मदत देता न आल्याने शेतकऱ्यांच्या मदतीचे सुमारे ४६० कोटी रुपये गेल्या तीन महिन्यापासून पडून असून त्यामध्ये सर्वाधिक नुकसान विदर्भ मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री व मा.राज्यमंत्री, महसूल व प्रधान सचिव, महसूल यांना पत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) व (४) राज्यात खरीप-२०१५ मध्ये बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या पीकांच्या नुकसानीकरिता मदत म्हणून एकूण रुपये ५०९७.२६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. यापैकी एकूण रु. ३६९६.०५ कोटी इतकी मदत ६४५३१६३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे. उर्वरित निधी रु. १४०१.२१ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुदरगड, राधानगरी व आजरा तालुक्यातील प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर असणारा शेरा महसूल विभागाने अद्यापही कमी केलेला नसल्याबाबत

**(४) ३५३५७ (३०-११-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुदरगड-राधानगरी-आजरा तालुक्यातील फये, मेघोली, डेळे-चिवाळे,पाठगाव, चित्री हे प्रकल्प पुर्ण होऊन सुद्धा सदर प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीवर असणारा शेरा महसूल विभागाने अद्यापही कमी केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास यामुळे जमीन खरेदी विक्री, बँक कर्ज प्रकरणे या सर्वांचा निर्बंध असून सदरचा प्रकल्प पुर्ण होऊनही अनेक वर्ष प्रशासनाच्या निष्क्रिय धोरणामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पुनर्वसनाचे जाचक शेरे काढून टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०३-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) फये, मेघोली व चित्री प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील बहुतांश ७/१२ वरील शेरे कमी करण्यात आले आहे. तसेच डेळे-चिवाळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील जमिनीवरील शेरे कमी करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तथापी पाटगाव प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे कामकाज सुरु असल्याने वरीलप्रमाणे ७/१२ वरील शेरे कमी करण्यात आलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धामणी (जि.वाशिम) येथील शेतकऱ्याला अतिवृष्टीचे अनुदान देण्याबाबत

**(५) ३६१६१ (१६-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.मनोहर रायबान जामोदे रा.धामणी, जि.वाशिम यांची सन २०१३ मधील अतिवृष्टीमुळे खरडून गेलेल्या जमिनीची व पिकाचे झालेले नुकसानी बाबत चुकीच्या सर्वेक्षणामुळे त्यांना अद्यापर्यंत कोणतीही शासकीय मदत मिळाली नसल्यामुळे त्यांना मदत मिळावी म्हणून त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी वाशिम यांच्याकडे दिनांक ५ जून, २०१५ रोजी एका निवेदनानुसार मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाद्वारे जिल्हा प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०४-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा प्रशासनामार्फत विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य शासनाने पथदर्शी प्रकल्पांतर्गत यवतमाळ व उस्मानाबाद या दोन जिल्हयांची निवड केल्याबाबत

**(६) ३६९३५ (१३-०१-२०१६). श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद व यवतमाळ जिल्हयात दुष्काळाने बाधित शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयात सध्या देण्यात आलेले शेततळ्यांचे उद्दिष्ट हे फक्त १००० असून याअंतर्गत एससी, एसटी व अल्प भूधारकांनाच याचा लाभ देण्यात येत आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे असून सदर योजनेचे उद्दिष्ट वाढवून यामध्ये बहु भूधारकांचाही समावेश करावा व त्यांना या योजनेचा फायदा होण्याच्या दृष्टीने योजनेतील संबंधित अटी शिथिल कराव्यात अशी मागणी लोकप्रतिनिधी व जनसामन्यांतून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कवरदरी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील नदीवर प्रकल्प उभारण्याबाबत**

**(७) ३८१७० (२९-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कवरदरी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे नदी असून या नदीचे पाणी पावसाळ्यात कोणत्याही उपयोगात न येता वाहून जाते या नदीच्या जवळपास २०० हेक्टर शेती आहे, या नदीवर प्रकल्प उभारला गेला तर येथील शेतकऱ्यांना शेतीला पाणी मिळून त्यांच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी असलेल्या नदीवर शासनाने निर्णय घेऊन प्रकल्प उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०६-२०१७) :** (१) होय.
(२) मौजे कवरदरी (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम अंतर्गत डी.पी.आर क्र. ४ मध्ये साठवण तलाव अंतर्भूत केला आहे. सदर गावात प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून प्रकल्पाच्या विस्तृत अभ्यासानंतर तथा सफलतेबाबत पडताळणी करुन कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल (जि. रायगड) तालुक्यातील कोनी, केळवणे व पुनाडे खारभूमी योजनांना केंद्र शासनाच्या सागरी किनारा नियमन कायद्यामधून सूट मिळण्याबाबत**

**(८) ५३७३७ (२९-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि. रायगड) तालुक्यातील कोनी, केळवणे, पुनाडे, व शेती इत्यादी खारभूमी योजनांना केंद्र शासनाच्या सागरी किनारा नियमन कायदा सन १९९१ व २०११ मधून सूट मिळण्याबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०५-२०१७) :** (१) नाही.

केंद्र शासनाच्या सागरी किनारा नियमन कायदा सन १९९१ व २०११ कायद्यामधून सूट मिळणे बाबतचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून सदस्य सचिव (MCZMA) पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि. ११ डिसेंबर, २०१२ अन्वये सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाला मान्यता देण्यापूर्वी सदस्य सचिव (MCZMA) पर्यावरण विभाग यांनी सदर योजनांचा Rapid EIA करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील कोनी-केळवणे तसेच उरण तालुक्यातील पुनाडे या योजनांसह एकुण ७ खारभूमी योजनांची कामे CSR निधी अंतर्गत हाती घेणेबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. याबाबत दि.२६ ऑगस्ट, २०१५ रोजी मंत्रालय मुंबई येथे मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा.मंत्री महोदय यांनी दिलेल्या सुचने नुसार ओ.एन.जी.सी., जे.एन.पी.टी. व सिडको या कंपन्यांना सदर योजनांचे प्रस्ताव CSR अंतर्गत निधी मागणीसाठी सप्टेंबर-२०१५ मध्ये सादर केले आहेत. सदर कंपन्याकडून निधी प्राप्त होताच या योजनांचा Rapid EIA करुन पर्यावरण विभागाची मान्यता घेणे शक्य आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सरवड (ता.धुळे) या गावांत शेतकऱ्यांचा खळयाला आग लागून झालेले नुकसान

**(९) ५५९०५ (२२-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरवड (ता.धुळे) या गावांत शेतकऱ्यांचा खळयाला अचानक आग लागल्याने दोन ते अडीज लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांचा झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१७) :** (१) होय.

(२) शासन निर्णय सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३ दि.१३.०५.२०१५ मधील निकषान्वये मदत अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) परिसरातील राज्य परिवहन महामंडळाच्या डेपोत सोयीसुविधा पुरवण्याबाबत**

**(१०) ५६१०९ (२४-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) परिसरातील राज्य परिवहन महामंडळाच्या डेपोत सोयीसुविधा पुरवण्याकडे परिवहन महामंडळ दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील डेपो मोक्याच्या जागेवर असल्याने ते शहराबाहेर स्थलांतरीत करुन एसटी डेपोंच्या जमिनींवर भूमाफियाचा डोळा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती एसटी डेपोला आवश्यकती सोयीसुविधा पुरवून भुमाफियांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०५-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या कल्याण बसस्थानकात प्रवाशांकरीता प्रतिक्षालयात बसण्यासाठी मार्बलची आसनव्यवस्था लाईट, पंखे, पिण्यंचे पाणी, उपहारगृह, तिकीट आरक्षण व्यवस्था, चौकशी कक्ष, हिरकणी कक्ष, पुरुष व महिला प्रवाशांकरिता प्रसाधनगृह, पार्सल कक्ष, पोलिस चौकी, कॉक्रिटीकरण केलेला वाहनतळ इत्यादी सुविधा आहेत. प्रसाधनगृह चालकांकडून बसस्थानकाची स्वच्छता मोफत केली जाते. आवश्यकतेनुसार वेळोवेळी बसस्थानकाची दुरुस्ती करण्यात येते.

कल्याण आगार शहराबाहेर विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या विचाराधिन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आळसंद, बलवडी (जि.सांगली) या परिसरात वादळी पावसामुळे साडेतीन कोटीचे नुकसान झाल्याबाबत**

**(११) ५६७१२ (२२-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळसंद, बलवडी (जि.सांगली) या परिसरात दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास झालेल्या वादळी पावसामुळे सुमारे साडेतीन कोटीचे नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या नुकसानग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) होय.
दि१७ मे, २०१६ रोजी वादळीवाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसामुळे घरांची पडझड, पॉली हाऊस, छपरे, फळपिके इ. च्या झालेल्या नुकसानाचे पंचनामे करण्यात आले असून बाधितांना शासन धोरणानुसार नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सांगली यांचेमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण, मुरबाड, अंबरनाथ व शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील शासकीय गुरचरण जमिनी तसेच वन विभागाच्या जमिनींमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत असल्याबाबत

**(१२) ५६७७७ (१५-०७-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण, मुरबाड, अंबरनाथ व शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील शासकिय गुरचरण जमिनी तसेच वन विभागाच्या जमिनींमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत असल्याचे माहे जून २०१६ रोजी त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, शासकिय जमिनींवरील अनधिकृत बांधकामे निष्काषीत करुन अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामांना अभय देणाऱ्या संबंधित महसूल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

कल्याण, मुरबाड, अंबरनाथ व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील वन विभागांच्या जमिनीमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कालावधीमध्ये निदर्शनास आले नाही.

तथापि, मुरबाड तालुक्यातील ०.०४८० हे. वनक्षेत्रावर तसेच शहापूर तालुक्यातील ०.०१२८ हे. खाजगी वनक्षेत्रावर दि. ०२.०५.२०१६ रोजी अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले होते.

(२) उपरोक्त मुरबाड व शहापूर तालुक्यातील अतिक्रमणाची चौकशी करणेत आली असून सदर अतिक्रणाकरिता संबंधित आरोपींवर अनुक्रमे राउंड गुन्हा नं. ३ई/दि. २८.०६.२०१६ व ई-०१/१६-

१७, दि. ०५.०५.२०१६ अन्वये वनगुन्हा नोंद करण्यात आला आहे. मुरबाड तालुक्यातील सदर आरोपींनी गुन्हा मान्य केला असून वनपाल, देहरे यांचे स्तरांवरुन पुढील चौकशी करण्यात येत आहे. शहापूर तालुक्यातील अतिक्रमण त्याच दिवशी दि. ०२.०५.२०१६ रोजी निष्कासित करण्यात आली असून सदर गुन्ह्यातील आरोपींना दिवाणी न्यायालय, शहापूर येथे हजर करणेत आले असता संबंधितास न्यायालयाने जामीन मंजूर केला असून प्रकरणी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणेबाबतची कार्यवाही वनपरिक्षेत्र स्तरांवरुन करण्यात येत आहे.
(३) वन जमिनीवरील अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामांना अभय देण्याची बाब निदर्शनास आलेली नाही. सबब वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग-रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रामध्ये मासेमारी करण्यासाठी शासनाने ६० दिवसांची पावसाळी मासेमारी बंदी केल्याबाबत**

**(१३) ५६८०५ (१२-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग-रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रामध्ये मासेमारी करण्यासाठी शासनाने ६० दिवसाचा पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी पावसाळी मासेमारी नारळीपौणिमेपर्यंत मच्छीमारी नौका मासेमारीसाठी जात नसल्याने याचा फायदा परराज्यातील मच्छिमारांना होणार असल्याने सदर बंदी कालावधी बाबत शासनाने फेरविचार करावा अशी मागणी मच्दिमारांनी व त्यांच्या संघटनांनी मा. मत्स्यविकास मंत्री व मत्स्य विभागाकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मच्छिमार व त्याच्या संघटनांनी शासनाकडे बंदी उठविण्याच्या कालावधीचा फेरविचार करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०८-०५-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) राज्याच्या १२ नॉटीकल मैल जलधी क्षेत्राच्या हद्दीत व केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील विशेष आर्थिक क्षेत्रात (Exclusive economic zone) १ जून ते ३१ जुलै याप्रमाणे एक समान पावसाळी मासेमारी बंदी लागू करण्याचा निर्णय दिनांक १ जून, २०१५ पासून घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य मंत्रीमंडळाच्या मान्यतेने आकस्मिकता निधीतून काढलेल्या रकमेचा नगण्य वापर केल्याबाबत

**(१४) ५८७७० (२२-०८-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मंत्रीमंडळाच्या मान्यतेने अचानक निर्माण झालेल्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी आकस्मिकता निधीतून रक्कम काढली जाते परंतु २०१४-१५ मध्ये या निधीतून काढलेल्या रकमेचा नगण्य वापर केल्याची बाब नुकतीच माहे एप्रिल व मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक आपत्तीच्या मुकाबला करण्यासाठी मोठया रकमा या निधीतून काढण्यात आल्या मात्र त्याचा वापर अनुक्रमे १२.२६ टक्के, ६.८७ टक्के आणि १७.१६ टक्के इतकाच करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधी नगण्य वापर करण्यामागची कारणे काय आहेत व याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुहागर (जि. रत्नागिरी) येथील आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(१५) ५९९८४ (२०-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील प्रमुख नगदी पीक म्हणून ओळखला जाणाऱ्या आंबा पिकाला अवकाळी पाऊस व सतत बदलत असलेल्या हवामानामुळे गुहागर (जि. रत्नागिरी) येथील आंबा बागायतदारांचे नुकसान झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंब्याचे वाढलेले दर स्थानिक बाजारपेठतील ग्राहकांच्या आवाक्या बाहेरचे असल्याने आंबा व्यावसायिकांनी स्थानिक बाजारपेठेत आंबाच विक्रीस ठेवला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बागायतदारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०५-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखलगाव वाडा मार्गे माजगांव सुरकुंडी गोरेगाव बस सेवा सुरु करणेबाबत**

**(१६) ६०८७२ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चिखलगाव (ता.खेड, जि.पुणे) येथे चासकमान धरणामुळे गावे विभागली गेल्याने सन १९९५ सालापासून अद्यापपर्यंत गावात एस.टी.सुविधा पोहचली नसल्याचे माहे मे २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे वाळद येथे नवीन पूल झाल्याने शालेय विध्यार्थी व नागरिकांची गैरसोय टाळणेकरिता चिखलगाव वाडा मार्गे माजगांव सुरकुंडी गोरेगाव बस सेवा सुरु करणेबाबत आगारप्रमुख खेड यांसकडे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मार्गाने एस.टी.सुविधा उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०६-२०१७) :** (१) व (२) होय.
(३) सदर मार्ग नवीन असल्याने राज्य परिवहन प्रवासी वाहतूकीस रस्ता योग्य असल्याबाबतचा ना हरकत दाखला, गावांची नावे, नकाशा व गावांची लोकसंख्या याबाबत तपशिलवार माहितीसाठी जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे मागणी करण्यात आलेली आहे.

वाळद येथे नवीन पूल झाल्याने त्याबाबतचा ना हरकत दाखल प्राप्त झाल्यास माजगांव, सुरकुंडी, गोरेगांव ही राज्य परिवहन सेवेपासून वंचित गावे मुख्य बाजारपेठ वाडा या ठिकाणास जोडली जातील. तसेच राज्य परिवहन पुणे विभागामार्फत सदर मार्गाचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून वाडा ते चिलखगांव मार्गावर नाल्याची मोरी वाहून गेल्याने बांधकाम करणे आवश्यक आहे. गोरेगाव फाटा ते गोरेगाव रस्ता अरुंद असल्याने रस्ता पाहणी करता आलेली नाही. गोरेगाव फाटा ते चिखलगांव अरुंद रस्त्यामुळे दोन मोठी वाहने एकावेळी जाऊ शकत नाही, असे निदर्शनास आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग मुंबई या मार्गावर एस.टी.सी वातानुकुलीत वोल्वो बस सुरू करण्याबाबत**

**(१७) ६२१०१ (२४-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पुणे मार्गावर धावणाऱ्या शिवनेरी या वाहतूकीच्या धर्तीवर अलिबाग मुंबई या मार्गावर एस.टी.सी वातानुकुलीत वोल्वो बस सुरू करणे, तसेच अलिबाग एसटी स्टॅंड परिसरात सीसीटीव्ही बसविणे बाबत सुमारे वर्षभराचा कालावधी उलटूनही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने निर्णय घेवून अलिबाग मुंबई या मार्गावर एस.टी.सी वातानुकुलीत वोल्वो बस सुरू करणे, तसेच अलिबाग एसटी स्टॅंड परिसरात सीसीटीव्ही बसविणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१७) :** (१) व (२) वातानुकूलित सेवा चालविण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडे मर्यादित स्वरुपात वातानुकूलित बसेस उपलब्ध आहेत. सद्य:स्थितीत अलिबाग-मुंबई मार्गावर २० निमआराम व ११ साध्या फेऱ्या सुरु आहेत.

कैंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवे (MORTH), भारत सरकार यांच्याकडून प्रकल्प निधी मिळविण्यासाठी राज्य शासनाद्वारे दिनांक १६.०३.२०१७ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या अगारांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिंचाळ (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथील शेतशिवारात १०९ बंड्या तणस जळून खाक झाल्याबाबत**

**(१८) ६३६१७ (२२-०८-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचाळ (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथील शेतशिवारात दिनांक २२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास १०९ बंड्या तणस जळून खाक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती त्यानुषंगाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) शासन निर्णय सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दि.१३.०५.२०१५ मधील निकषान्वये मदत अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मच्छिमारांच्या सुरक्षेसाठी DATS (DISTRESS ALERT TRANSMETER) यंत्र मोफत उपलब्ध करुन देणेबाबत

**(१९) ६४८३२ (१२-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छिमारांच्या यांत्रिक बोटी खोलवर समुद्रात मासेमारीसाठी गेल्यावर बोट बुडणे, खलाशी समुद्रात पडणे, आग लागणे वा दहशतवादी हल्यासारख्या आपातकालीन परिस्थितीच्या वेळी बोटीत तात्काळ मदत मिळण्यासाठी भारतीय तटरक्षक दलाने इस्त्रोच्या सहाय्याने DATS (DISTRESS ALERT TRANSMETER) हे यंत्र उपलब्ध करुन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्रातील मासेमारीच्या वेळी उपयोग होण्यासाठी मच्छिमारांना सदर यंत्र मोफत पुरविण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर २०१५ वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२६-०४-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) केंद्र शासनाच्या नील क्रांती योजनेअंतर्गत राज्यातील मच्छिमारांना DATS हे उपकरण देण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर यंत्रणा राज्यातील ७ सागरी किनाऱ्यालगतच्या जिल्ह्याच्या ठिकाणी नोंदणीकृत झालेल्या सुमारे १७०००, यांत्रिक/बिगर यांत्रिक नौकावर बसविण्याचे प्रस्तावित आहे. एका उपकरणाची अंदाजे किंमत रु.१७,०००/- आहे. सदर यंत्रणा बसविण्यासाठी अंदाजे एकूण खर्च रु.२८.९० कोटी इतका अपेक्षित आहे. सदर बाब ही नवीन बाब असल्यामुळे प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वर्सोवा येथील दोन मच्छिमार सोसायटयांचा डिझेलचा परतावा मिळणेबाबत

**(२०) ६४८६४ (१२-०८-२०१६). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वर्सोवा येथील दोन मच्छिमार सोसायटयांचा माहे फेब्रुवारी, २०१५ ते मार्च २०१६ पर्यंतचा डिझेलचा परतावा अद्यापर्यंत देण्यात आला नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डिझेल परतावा न मिळाल्यामुळे मच्छिमारांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डिझेल परतावा मच्छिमार सोसायटयांना तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२३-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील सन- २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षात मंजूर केलेल्या ठिबक सिंचनाचे शेतकऱ्यांना अनुदान मिळणेबाबत**

**(२१) ६५४३६ (१७-१२-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील सन- २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षाच्या काळात पंतप्रधान कृषी सिंचन योजनेअंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात आली आहे काय,
(२) असल्यास सोलापूर जिल्हयात सन २०१३-१४ मध्ये ११०५२ शेतकऱ्यांना व सन- २०१४-१५ मधील ३३३४ शेतकऱ्यांना अनुक्रमे २१.६६ व कोटी ९.३३ कोटी रक्कम आत्तापर्यंत मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती थकित असलेले अनुदान त्वरित मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३०-०३-२०१७) :** (१) केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सन २०१३-१४ या वर्षात राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान म्हणून व सन २०१४-१५ या वर्षात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत शेतावरील पाणी व्यवस्थापन घटकांतर्गत राबविण्यात आली.
(२) व (३) सोलापूर जिल्हयातील सन २०१३-१४ या वर्षातील ८८१२ लाभार्थ्यांचे रु.२०.५४ कोटी रकमेचे व सन २०१४-१५ या वर्षातील पूर्वसंमती दिलेल्या ९६६ लाभार्थ्यांचे रु.३३१ कोटी रक्कमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.
(४) निधी उपलब्धतेनुसार प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील भगवंत गड व बांदिवडे गावाजवळील काजव्याची दुरुवस्था झाल्याबाबत**

**(२२) ६५८११ (०५-०१-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील भगवंत गड व बांदिवडे गावांना जोडणारा कालवल खाडीपात्रातील बादिवडे गावाजवळील काजवे खचला असून याठिकाणच्या सिमेंटच्या मोठ्या पृष्ठभागांवरील स्लपपासून निसटल्यामुळे हा काजवे वाहतूकीस धोकादायक बनला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास,सदरहू काजवेच्या पृष्ठभागांवरील भेग दिवसेंदिवस रुदांवत असल्याने या काजवेची विनाविलंब पुर्नबांधणी करण्याबाबत ग्रामस्थांनी तसेच बांदिवडे व चिंदर ग्रामपंचायतीने काजवेची नव्यानी उभारणी करण्यात यावी असा ठराव मांडून उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालवण, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री यांच्याकडे मागील १ वर्षापासून सातत्याने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू मागणीनुसार बांदिवडे गावांतील काजवेच्या पुर्नबांधणीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०५-२०१७) :** (१) मालवण (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील भगवंतगड व बांदिवडे गावांना जोडणारी बांदिवडे खारभूमी योजनेची उघाडी खचलेली आहे.

(२) होय, असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) बांदिवडे खारभूमी योजना, ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) गिरीस्थान येथील मिनी ट्रेन सेवा बंद केल्याबाबत**

**(२३) ६५८२२ (१६-१२-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) गिरीस्थान येथील मिनी ट्रेन रेल्वे प्रशासनाने बंद केल्याने पर्यटकांची संख्या कमी झाल्यामुळे स्थानिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिनी ट्रेन बंद अवस्थेत असल्यामुळे रेल्वे स्थानकाच्या स्वच्छतेकडे नगरपरिषदेने दुर्लक्ष केले आहे तसेच हॉटेल व इतर छोटे-मोठे व्यवसायावर परिणाम झाला असून नगरपरिषदेच्या उत्पन्नावरही परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माथेरान गिरीस्थानची बंद केलेली मिनी ट्रेन पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०२-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
दि.८.५.२०१६ पासून मिनी ट्रेन बंद आहे.
(२) अंशत: खरे आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत माथेरान नगरपरिषद सदस्य, कर्मचारी, नागरीक यांच्या सहभागातून माथेरान रेल्वे स्टेशन परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. माथेरान रेल्वे स्टेशनचा परिसर माथेरान नगरपरिषदे कडून वेळोवेळी स्वच्छ केला जातो. त्यामुळे रेल्वे स्थानकाच्या स्वच्छतेकडे माथेरान नगरपरिषदेने दुर्लक्ष केले हे म्हणणे खरे नाही.

तथापि मिनी ट्रेन बंद असल्यामुळे हॉटेल व इतर व्यावसायावर परिणाम झाला हे खरे आहे.
(३) व (४) सदर विषय केंद्र शासन (रेल्वे मंत्रालय) यांचे अखत्यारितील आहे. तथापि, मिनी ट्रेन रेल्वे सेवा चालू करणे बाबत सेंट्रल रेल्वेनी समिती स्थापन केली आहे. समितीने दिर्घकालीन व अल्पकालीन उपाययोजना करण्याबाबत अहवाल सादर केला असून तो विचाराधिन आहे असे ADGM मध्य रेल्वे यांनी कळविले आहे.

---

## अकोला येथील मुख्य बसस्थानक शहराबाहेर स्थलांतरित करण्याबाबत

**(२४) ६६७९८ (१६-१२-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील (जि. अकोला) मुख्य बसस्थानकाजवळ वाहनांचे वाढते प्रमाण मोठी रहदारी, अपघात, यामुळे शहरातील मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होत असल्याने सदर बसस्थानक शहराबाहेर स्थलांतरित करण्यात यावे अशी नागरिकांची तसेच लोकप्रतिनिधींची सतत मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) उक्त मुख्य बसस्थानक शहराबाहेर स्थलांतरित करण्याचे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मुख्य बसस्थानक शहराबाहेर स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०३-२०१७) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उपवडे व बोलोली परिसरामधील शेततळी आणि बंडीगची कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(२५) ६७७३३ (१६-१२-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उपवडे व बोलोली परिसरामध्ये शेततळी आणि बंडीगची कामे झाल्याचे दाखवून रक्कम घेतलेली आहे असे करवीर पंचायत समितीच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या मासिक सभेमध्ये सदस्यांनी निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कृषी अधिकारी करवीर यांच्या दुर्लक्षामुळे तालुक्यामध्ये कृषी विभागाच्या कामात गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार बनावट कामे दाखवून फसवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१४-०६-२०१७) :** (१) होय.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विटा, खानापूर, आटपाडी, इस्लामपूर (जि.सांगली) येथील एस.टी. आगाराची अत्यंत दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) ६८४०५ (१७-१२-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा, खानापूर, आटपाडी, इस्लामपूर (जि.सांगली) येथील एस.टी. आगाराची अत्यंत दुरवस्था झाली असून परिसरातील अस्वच्छतेमुळे प्रवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या अनेक शहरांमध्ये अस्वच्छतेमुळे डेंग्यू, चिकन गुनिया, मलेरिया आदिंसारख्या साथीचा फैलाव जोरात असून असतांनाही आगाराच्या स्वच्छतेने महामंडळाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) खानापूर (जि.सांगली) बसस्थानक हे खासगी वाहनांचे वाहनतळ, खासगी व्यावसायिकांचे अतिक्रमण आणि स्वच्छता गृहाची अपुरी सुविधा आदिंच्या विळख्यात सापडले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त एस.टी.आगारात परिसरात रस्त्यांवर खड्डे, परिसरात शौचालय, स्वच्छतागृह नसल्याने व त्या ठिकाणी ड्रेनेजची पाईप लिक असल्यामुळे परिसरात डासांचा प्रादुर्भाव होत आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीअंती यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त आगाराच्या स्वच्छतेबाबत व दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-०४-२०१७) :** (१), (२), (३) व (४) नाही.
(५) व (६) सदर चौकशीअंती स्वच्छतागृह चालविणा-या लोकसेवा समाज सुलभ सेवा संस्था, हातनूर या संस्थेस पत्राद्वारे समज देवून स्वच्छतेबाबत त्रूटी राहणार नाहीत याची खबरदारी घेणेच्या सूचना दिल्या आहेत. तसेच सदर ठिकाणच्या स्वच्छते व दुरुस्तीबाबत राज्य परिवहन महामंडळाकडून कार्यवाही करणेत येत आहे. रा.प. महामंडळाने खानापूर ग्रामपंचायत, तहसलिदार, प्रांत अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेकडे सांडपाणी निर्गमनाबाबत वारंवार पत्रव्यवहार व समक्ष भेटून पाठपूरावा केला आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदूरबार जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागाच्या नाविन्यपूर्ण योजनेबाबत**

**(२७) ६९९७८ (१६-१२-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदूरबार जिल्ह्यात पशु संवर्धन विभागाच्या नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत दुधाळ जनावरे, शेळी पालन व कुकुटपालन व्यवसाय तसेच, आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत महिला बचत गटांसाठी विविध योजनेचे प्रकरणे मागील १ वर्षापासून मंजूरी अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे दारिद्रय रेषेखालील सर्व समाजातील लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिल्याने त्यांच्यामध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या योजनेचे प्रकरणे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२६-०४-२०१७) :** (१) हे खरे नसून पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.
(२) सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये नंदुरबार जिल्हयात पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना राबविण्यासाठी लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

या विविध योजनांमध्ये पशुधन, कुक्कुटपक्षी, गोठा / वाडा / शेडचे बांधकाम, विद्युतचलीत कडबाकुट्टी संयंत्राची खरेदी, खाद्य साठविण्यासाठी शेड, पशुपक्षांचा विमा, खाद्याची व पाण्याची भांडी, आरोग्य सुविधा औषधोपचार, पक्षीगृहाचे बांधकाम, उपकरणांची खरेदी, ब्रुडर, स्टोअर रुम, अंडी उबवणूक संयंत्र खरेदी या विविध उपघटकांचा समावेश असून लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर प्रथमत: लाभार्थ्याने गोठा / वाडा / शेड, पक्षीगृह, स्टोअररुम याचे बांधकाम करणे, साहित्य व उपकरणांची खरेदी करणे अपेक्षित आहे. तथापि, उपरोक्त प्रमाणे लाभार्थ्यांच्या स्तरावरुन पुर्तता न झाल्याने योजना पूर्णत्वास नेण्यास विलंब झालेला आहे. योजना अंमलबजावणी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयात कै.गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेचे शेतकरी अपघात विमा योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(२८) ७०४३१ (१६-१२-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयात कै.गोपीनाथ मुंडे अपघात विम्याचे ११७ प्रस्ताव पाठविले असता केवळ ७ प्रस्ताव मंजूर करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सोलापूर जिल्हयातील कै.गोपीनाथ मुंडे अपघात विम्याचे प्रस्ताव पूर्णक्षमतेने मंजूर करुन अपघात विम्याचे पैसे शेतकऱ्यांना देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०३-०४-२०१७) :** (१), (२) व (३) ऑगस्ट, २०१६ अखेर सोलापूर जिल्हयातील एकूण ५९ अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे प्रस्ताव विमा कंपनीकडे पाठविण्यात आले होते. त्यापैकी ७ प्रस्ताव मंजूर होऊन ४४ प्रस्तावांवर कार्यवाही चालू होती व ८ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले होते.

जानेवारी, २०१७ अखेरच्या अहवालानुसार सोलापूर जिल्हयातील एकूण १६५ प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखले केलेले असून त्यापैकी ८७ प्रस्ताव मंजूर होऊन ५५ प्रस्तावांवर कार्यवाही चालू आहे तसेच २३ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत.

प्रस्ताव मंजूरीचे प्रमाण व वेग वाढविण्यासाठी कृषि आयुक्तालय स्तरावर संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली सतत आढावा सभा घेऊन विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनी यांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तारापूर (जि. पालघर) अणूउर्जा प्रकल्प पीडीतांच्या पुनर्वसनाबाबत

**(२९) ७०८८२ (०७-०१-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि. पालघर) अणुउर्जा प्रकल्पातील १२५० प्रकल्पपीडीत ग्रामस्थ सन २००४ पासून विविध मुलभुत सुविधांपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना मुलभुत सुविधा तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०३-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, तारापूर अणुउर्जा प्रकल्प टप्पा क्र. ३ व ४ मुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांचे सर्वेक्षण जानेवारी, १९९४ मध्ये करण्यात आले होते. त्यानुसार मौजे अक्करपट्टी व पोफरण या दोन गावांतील विस्थापित कुटुंबांची संख्या ११६७ होती. तद्‌नंतर कृती समितीने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विस्थापित कुटुंबाच्या संख्ये मध्ये वाढ होऊन ती १२५० इतकी झाली आहे. सदर विस्थापित कुटुंबांचे दहिसर तर्फे तारापूर येथील स.नं.१३६ येथील ९८ हेक्टर शासकीय जमिनीवर पुनर्वसन करण्यात आले असून तेथे देय नागरी सुविधा पुरवण्यिात आल्या आहेत. १२५० विस्थापित कुटुंबांस १८५ चौ.मी. ते ७४० चौ.मी. चे भूखंड व त्यावर प्रकल्पग्रस्तांना ३०० चौ.फुटाची घरे बांधुन वाटप करण्यात आले आहे. तथापि, ३ प्रकल्पग्रस्त आढळून न आल्याने त्यांना घरांचे वाटप करण्यात आलेले नाही. प्रकल्पग्रस्तांना प्रति हेक्टर २.५ लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे. तसेच भूमिहीन प्रकल्पग्रस्तांना प्रतिकुटुंब रु. ३०,०००/- स्वेच्छा अनुदान देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जनावरांसाठी मोबाईल ॲम्ब्युलन्स सुरू करण्याबाबत

**(३०) ७१५७२ (१६-१२-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनावरांसाठी मोबाईल ॲम्ब्युलन्स सुरू करण्यात येणार असल्याने माहे ऑक्टोबर २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले हे खरे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती जनावरांसाठी मोबाईल ॲम्ब्युलन्स सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१०-०४-२०१७) :** (१), (२) व (३) राज्यात सध्या एकूण ६५ फिरते पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत. सदर फिरत्या दवाखान्यांची संख्या वाढविणे, फिरत्या दवाखान्यांद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये वाढ करण्याच्या हेतूने फिरत्या दवाखान्याचे बळकटीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे ते टाकाळी मानूर बस वेळेवर सोडण्याबाबत व नविन गाडी देण्याबाबत

**(३१) ७१६०० (१६-१२-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे ते टाकाळी मानूर बस वेळेवर सोडण्याबाबत व नविन गाडी देण्याबाबत लोकप्रतिनिधी दिनांक १७ जुलै, २०१६ रोजीच्या सुमारास मा.परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती धुळे ते टाकाळी मानूर बस वेळेवर सोडण्याबाबत व नविन गाडी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०३-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) लोकप्रतिनिधींच्या निवेदनानुसार दि.०१.१०.२०१६ पासून दिवाळी हंगाम पाहता धुळे त टाकळी मानुर मार्गावर नविन गाडी देवून धुळे ते टाकाळी मानुर बससेवा पुन:श्च सुरु करण्यात आली. तथापि, सदर फेरीस माहे ऑक्टोंबर, नोव्हेंबर व डिसेंबर, २०१६ या कालावधीत प्रवासी प्रतीसाद व आवश्यक भारमान प्राप्त न झाल्याने दिनांक २२.१२.२०१६ पासून उक्त फेरी पुन:श्च बंद करण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजगुरुनगर (पुणे ) येथील जिल्हा मध्यवर्ती रोपवाटिकेची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३२) ७१७१६ (१६-१२-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (पुणे) येथील चांडोली टोल नाक्याजवळच असणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती रोपवाटिकाचे अनुदान, यंत्र सामग्री खरेदी तसेच इतर कामांचे प्रस्ताव संबंधित कार्यालयाने पाठवूनही त्यावर काहीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रोपवाटिके मधील ग्रीन हाऊस मोडकळीस येणे, रोपांच्या पिशव्यांमध्ये गवत वाढणे, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था होणे असे प्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती जिल्हा मध्यवर्ती रोपवाटिकेची दुरवस्था थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२१-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सन २०१६-१७ मध्ये सामुग्री / विकासकामे या बाबीकरिता पुणे जिल्हयासाठी रु.६४ लाख निधी मंजूर आहे. रोपवाटिकेवरील एक ग्रीन हाऊसचे कामपुर्ण झालेले आहे, व दुसऱ्या ग्रीन हाऊसचे काम पुर्ण करण्यात येत आहे. रोपाच्या पिशव्यातील गवत काढणे इत्यादी कामे पुर्ण झालेली आहे. सदर योजनेस जिल्हा नियोजन समिती मार्फत अनुदान प्राप्त करुन कामे पुर्ण करण्यात येतील. रोपवाटिकेसाठी २०१६-१७ मध्ये कलमे/रोपे उत्पादनासाठी ९९००० चे लक्षांक देण्यात आले असून त्यापैकी ८२५०० इतकी विक्री योग्य कलमे/रोपे उपलब्ध असून त्यांची विक्री सुरु आहे.

(२), (३), व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्‌यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत**

**(३३) ७१९३८ (१६-१२-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्‌यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र बांधण्याची आवश्यकता तपासून शासनाला अहवाल सादर करण्याबाबत महात्मा फुले कृषी विद्‌यापीठ राहुरी यांना शासनाने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्देश दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील ठिकाणी शासकीय कृषि महाविद्‌यालयत व शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने येवला येथे शासकीय कृषि महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०६-२०१७) :** (१), (२), (३) व (४) येवला (जि.नाशिक) येथे कृषि महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र मंजूर करण्याची स्थानिक लोकप्रतिनीधींनी मागणी केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने तपासणी करण्याचे निर्देश महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेला देण्यात आले होते.

कृषि महाविद्यालय स्थापन करावयाच्या निकषानुसार ४० हेक्टर जमीन आवश्यक आहे. येवला येथे कृषि विभागाची ६० एकर जमीन उपलब्ध आहे. सदर जमीन निकषानुसार पुरेशी नसल्याचा अहवाल महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडून प्राप्त झाला आहे.

---

## राज्यातील, एसटी महामंडळाच्या, अधिकृत थांब्यावरील उपहारगृहात, ३० रूपयात चहा-नाश्ता उपलब्ध करून देण्याच्या योजनेबाबत

**(३४) ७३९१४ (१७-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील, एसटी महामंडळाच्या, अधिकृत थांब्यावरील उपहारगृहात, ३० रूपयात चहा-नाश्ता उपलब्ध करून देण्याची योजना, राज्य शासनाने सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात एकूण किती एसटी महामंडळाचे अधिकृत बस थांबे आहेत, त्यापैकी किती बस थांब्यावर, सदर चहा-नाश्ताची योजना सुरू केली आहे, सदर योजनेचे स्वरूप काय आहे,
(३) तसेच सदर योजनेमध्ये मोठया प्रमाणात फसवणुक होत असुन अधिकृत बस थांब्यातील चालकांनी नाश्त्याच्या पदार्थाचे आकारमान कमी केले आहे व कपाऐवजी छोटयाशा प्लास्टिकच्या ग्लासमध्ये चहा देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) तसेच एसटी महामंडळाच्या बहुतांश उपहारगृहे ही परप्रांतियांच्या ताब्यात असल्याचेही निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त उपगृहावर शासनाने कारवाई करण्याबाबत व एसटी बस थांब्यावर, चांगल्या दर्जाचे अन्नपदार्थ उपलब्ध करणे, स्वच्छता, स्वच्छ शौचालये, शुध्द पिण्याचे पाणी आदी सोयी-सुविधा प्रवाशांना उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०६-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) राज्यातील विविध मार्गावर प्रवाशांना जेवण तसेच अल्पोपहारासाठी एकूण २९ थांबे दिले असून सदर थांब्याचा करारनामा करतांना करारनाम्यामध्ये हॉटेलमधील खाद्य पदार्थांची दर सूची हॉटेलच्या प्रथमदर्शनी भागावर लावणेस तसेच रु.३०/- मध्ये चहा अधिक अल्पोपहार देण्याबाबतच्या अटींचा समावेश करण्यात आला आहे. त्याप्रमाणे थांबेधारक प्रवाशांना सुविधा देण्यात येत आहे.
(४) नाही.
(५) प्रवाशांना देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचा दर्जा, स्वच्छता, शुध्द पिण्याचे पाणी इ. सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महामंडळाद्वारे सर्वेक्षण केले जाते व प्रत्येक महिन्याला त्याची तपासणी केली जाते.

तसेच, ज्या हॉटेल चालकांकडून अटींचे उल्लंघन केले जाईल अशा हॉटेल चालकांचा थांबा रद्द करण्याच्या सूचना विभागांना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे मुंबई-पुणे मार्गावरील हॉटेल 'फुडमॉल', पुणे-भोर-महाड मार्गावरील हॉटेल 'आयुषा', तसेच पुणे-नाशिक मार्गावरील हॉटेल 'इंद्रप्रस्थ' यांनी प्रवाशांना रु.३०/- मध्ये चहा अधिक अल्पोपहार देण्याच्या अटीचे उल्लंघन केल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाद्वारे त्यांचा थांबा तात्काळ रद्द करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्याबबत

**(३५) ७३९७० (१४-०४-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्द शेतकऱ्यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना राबविण्याचा निर्णय शासनाने दि. ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला असून या योजनेअंतर्गत नवीन विहिरी खोदण्यासाठी अडीच लाख रुपये अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी केव्हापासून सुरु होणार व त्याची रुपरेखा काय आहे,

(३) असल्यास, या योजनेखाली सध्या मिळत असलेल्या १ लाख रुपये अनुदानात व ज्या विहिरी अर्धवट राहिल्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी वाढीव अनुदान मिळणार आहे काय,
(४) तसेच या योजनेखाली मिळणाऱ्या विहिरीवर विजेचे पंप बसविण्यासाठी अनुदान अगर कर्ज देण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास भाग (३) व (४) संदर्भात अनुदान मिळणार असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०६-२०१७) :** (१) होय. तथापि सदर निर्णय हा दिनांक ५ जानेवारी,२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(२) सदर योजनेची अंमलबजावणी सन २०१६-१७ या वर्षापासून सुरु झालेली आहे.
सदर योजनेंतर्गत खालील घटकांसाठी त्यापुढे नमूद मर्यादेत अनुदान देय आहे.

| अ.क्र. | बाब | अनुदानाची मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन विहिर | २,५०,०००/- |
| २ | जुनी विहिर दुरुस्ती | ५०,०००/- |
| ३ | इनवेल बोअरींग | २०,०००/- |
| ४ | पंप संच | २५,०००/- |
| ५ | वीज जोडणी आकार | १०,०००/- |
| ६ | शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण | १,००,०००/- |
| ७ | सुक्ष्म सिंचन संच | मंत्रीमंडळ उपसमिती निश्चित करेल अशा सूत्रानुसार |

(३) नाही. रु.२.५० लाख अनुदान मर्यादा फक्त २०१६-१७ या वर्षापासून मंजूर झालेल्या विहिरींसाठीच अनुज्ञेय आहे.
(४) या योजनेंतर्गत मंजूर विहिरीवर पंपसंच बसविण्यासाठी रु.२५,०००/- व वीज जोडणी आकार यासाठी रु.१०,०००/- एवढे अनुदान अनुज्ञेय आहे.
(५) प्रश्न भाग ३ व ४ ला दिलेल्या उत्तराप्रमाणे, निर्णय घेण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

**रायगड जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या गावठाण विस्तार योजनेसाठी गावालगतची शासकीय वा वनजमीन मिळण्याबाबत**

**(३६) ७४५१० (१७-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार गावठाण विस्तार योजनेसाठी गावालगतची शासकीय वा वनजमीन मिळण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा. वनेमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हमात गेल्या अनेक वर्षापासून गावठाण विस्तार योजना न राबविल्यामुळे अनेक विस्तारीत कुटूंबांना गावाठाणामध्ये सामावून घेण्यास अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०६-२०१७) :** (१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग व रोहा वन विभागातील ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार गावठाण विस्तार योजनेसाठी गावालगतची शासकीय वा वन जमिन मिळण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मा.मंत्री (वने) यांच्याकडे केल्याचे आढळून येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे संगलट (ता. खेड) आणि मौजे कोंडगे (ता. दापोली) गावांच्या सीमेवरील मध्यम जलसंधारण प्रकल्पाबाबत**

**(३७) ७४५९८ (१७-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे संगलट (ता. खेड) आणि मौजे कोंडगे (ता. दापोली) या गावांच्या सीमेवरील मध्यम जलसंधारण प्रकल्प मंजूर असून त्याची निविदा प्रकियाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोंडगे व संगलटसह परिसरातील सुमारे २० गावांची पाणी समस्या या प्रकल्पामुळे सुटणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भातशेती बाधित होत असल्याकारणाने ग्रामस्थांचा सदर प्रकल्पास विरोध आहे आणि त्यामुळे प्रकल्पाचे काम सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०६-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे संगलट (ता.खेड) आणि मौजे कोंढे, मौजे रुखी (ता.दापोली) या गावांच्या सीमेवर लघु सिंचन (जलसंधारण) विभाग रत्नागिरी या विभागाकडील संगलट साठवण तलाव हा लघु प्रकल्प मंजूर असून त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या नियोजनानुसार प्रकल्पीय पाणीसाठा ४००० स.घ.मी. असून त्यापैकी १३७ स.घ.मी. पाणी पिण्यासाठी राखून ठेवणेत आलेले आहे. मागणीनुसार त्याचा नजीकच्या गावांना पुरवठा करणेचे प्रस्तावित आहे.

(३) होय.

सदर काम सन २००९-१० मध्ये सुरु करण्यात आले व ग्रामस्थांच्या विरोधामुळे सन २०११ पासून काम बंद आहे. या प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र (१) संगलट, ता. खेड २०.६८ हेक्टर, (२) कोंढे, ता. दापोली ३९.१० हेक्टर (३) रुखी, ता. दापोली ४१.६८ हेक्टर असे एकूण १०१.४६ हेक्टर इतके आहे.

बुडीत क्षेत्रातील ग्रामस्थांच्या उपजिविकेचे साधन असणारी भातशेती, घरे व गोठे धरणामुळे अंशत: बाधीत होत आहेत व या गावांची नळपाणी योजना साठवण तलावामुळे बाधीत होत आहे. त्यामुळे त्यांचा या प्रकल्पास विरोध होत आहे.

(४) मौजे कोंढे व मौजे रुखी ही दोन गावे दापोली मंडणगड खेड विधानसभा मतदार संघात समाविष्ठ आहे. मौजे कोंढे व रुखी  या गावातील ग्रामस्थांच्या समवेत तत्कालीन मा. आमदार श्री. सूर्यकांत दळवी यांनी सन २०१० ते २०१४ या कालावधीत वारंवार बैठका घेवून सुध्दा सदर दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी नियोजित धरणाच्या ठिकाणास विरोध केला आहे. प्रकल्पाच्या भूसंपादनास मौजे कोंढे व रुखी गावातील ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे संपादित करावयाच्या क्षेत्राची संयुक्त मोजणी होवू शकली नाही मौजे कोंढे आणि रुखी येथील ग्रामस्थांना मौजे संगलट येथील प्रस्तावित ठिकाणी कमी उंचीचे धरण बांधल्यास ग्रामस्थांनी मंजूरी मिळेल काय अशी विचारणा  लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, रत्नागिरी यांचे कार्यालयाचे दिनांक २८/०८/२०१२ च्या पत्रान्वये केली असता ग्रामपंचायत कोंढे व रुखी यांनी संगलट येथील प्रस्तावित ठिकाणी धरण बांधण्यास विरोध असल्याचे अनुक्रमे ठराव क्र. २ दिनांक ११/०९/२०१२ व ठराव क्र.१३ दिनांक ११/१०/२०१२ अन्वये कळविले आहे. संगलट येथे साठवण तलाव बांधणेकरीता ग्रामस्थ कोंढे व रुखी यांचेशी वारंवार चर्चा करुनही सदर प्रकल्पाचे काम सुरु करणेस ग्रामस्थ तयार नाहीत.

आताचे दापोली विधानसभा मतदारसंघाचे मा. आमदार श्री. संजयराव कदम यांचे समवेत संबंधीत दोन्ही गावातील ग्रामस्थ व लघु सिंचन (जलसंधारण) उपविभाग दापोली या कार्यालयाचे प्रतिनिधी यांचे बरोबर बैठक घेवून सदर ग्रामस्थाचे धरणाची उंची कमी करुन धरणास संमती देणेबाबत व त्यांचा धरणास असलेला विरोध कमी करण्याचे  नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाच्या कामांसाठी फेर निविदा मागविण्यात आल्याने जुन्या निविदा भरलेल्या धारकांची रक्कम पडून असल्याबाबत**

**(३८) ७४६६६ (१४-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाच्या कामांसाठी फेर निविदा मागविण्यात आल्याने व त्या निविदा खुली करण्यात आल्याने जुन्या निविदा भरलेल्या धारकांची अनामत रक्कम अडकून पडली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र निविदा धारक वगळता अन्य सर्व कत्रांटदारांची अनामत रक्कम परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०६-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) फेर निविदा झाल्यामुळे जुन्या निविदा रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे ई-निविदा प्रणालीनुसार अनामत रक्कम कंत्राटदारांच्या खात्यामध्ये आपोआपच परत जमा झालेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मांजरे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील खारभूमी विभागामार्फत बंधाऱ्याचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(३९) ७४९१२ (१२-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे खारभूमी विभागामार्फत बांधण्यात येत असलेल्या आणि २५० एकर खाजण क्षेत्र विकासाखाली आणणाऱ्या बंधाऱ्याचे काम गत चार वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी झालेल्या बैठेकीवेळी मौजे मांजरे गावातील सध्या मंजूर असलेल्या बांधाच्या पुढील भागात म्हणजे जेटीपासून स्मशानभूमीपर्यंत बांध वाढविणे, मांजरे मराठी शाळेपासून जेटीपर्यंत रस्ता करणे याबाबत प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना मा. राज्यमंत्री, खारभूमी यांनी संबंधितांना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काम अपूर्णावस्थेत राहण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व बंधाऱ्याचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-०५-२०१७) :** (१) नाही.

मांजरे खारभूमी येजना ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे व सद्यस्थितीत ९० टक्के काम पूर्ण झाले आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या संशोधन व विस्तार कार्याशी निगडित असणा-या २६ योजना बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(४०) ७५३९५ (१४-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कृषी विभागाच्या संशोधन व विस्तार कार्याशी निगडित असणाऱ्या २६ योजना बंद करण्याचा निर्णय माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना बंद करण्यापूर्वी शेतकरी वा तत्सम व्यक्तींकडून हरकती व सूचना मागविल्या होत्या काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त योजना बंद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

**श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०६-२०१७) :** (१) (२) (३) व (४) कृषि विभागामार्फत पुढीलप्रमाणे योजना राबविण्यात येतात. १) केंद्र पुरस्कृत योजना २) राज्य योजना ३) जिल्हा वार्षिक योजना. यामध्ये काही योजनांची द्विरुक्ती होत असल्याचे नियोजन विभागाच्या MPSIMS या प्रणालीवर आढळून आले होते. त्यामुळे नियोजन विभागाच्या निदेशानुसार सदरची द्विरुक्ती टाळण्याच्या उद्देशाने दिनांक २४/१०/२०१६ रोजी काही योजना कमी करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदरच्या शासन निर्णयाद्वारे कमी करण्यात आलेल्या योजना अथवा त्यातील घटक हे दुसऱ्या योजनांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत अथवा दुसऱ्या स्वरुपात त्या योजना सुरु आहेत. त्यामुळे सदर योजनांचा वा त्यातील घटकांच्या लाभांपासून शेतकरी वंचित राहणार नाहीत.

---

**मुंबई शहर व उपनगरातील कुलाबा, वरळी आणि मालवणी परिसरातील खारफुटी जंगलांचे संरक्षण करण्याबाबत**

**(४१) ७५८५५ (१७-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील कुलाबा, वरळी आणि मालवणी परिसरातील खारफुटीचे जंगले वाचविण्यासाठी भवताली तारांचे कुंपण घालण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०६-२०१७) :** (१) मुंबई व उपनगरातील खारफुटीची जंगले वाचविण्यासाठी सदर क्षेत्राभोवती संरक्षक भिंत बांधण्याचा निर्णय वन विभागाने घेतला आहे.

(२) कांदळवन संवर्धन प्रतिष्ठानने सुमारे रुपये ३ कोटींची तरतूद सदर कामासाठी केली आहे.

(३) सदरची कामे CRZ क्षेत्रात असल्याने महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची (MCZMA) परवानगी अनिवार्य असल्याने ती घेण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदरचे काम कांदळवनापासून ५० मी. च्या आत असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयात Notice Of Motion दाखल करुन पुढील रितसर प्रक्रिया (निविदा इ.) करण्यात येईल. तसेच सदर बांधकाम सुरु करण्यापूर्वी उपरोक्त बाबींची पूर्तता करणे आवश्यक असल्याने सर्व परवानग्या प्राप्त झाल्यानंतरच प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यात विलंब झालेला नाही.

---

## वाशिम जिल्हा येथे कृषि विभागातील गुणवत्त्ता नियंत्रण व तपासणी अधिकारी लाच मागत असल्याबाबत

**(४२) ७६१४९ (१४-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा येथे कृषि विभागातील गुणवत्त्ता नियंत्रण व तपासणी अधिकारी हे जिल्हयातील कृषि केंद्रावर जाऊन गुणवत्त्ता नियंत्रण व तपासणीच्या नावावर प्रत्येकी उत्पादनावर २००० रुपये लाच मागत असल्याची तक्रार जिल्हयातील कृषि केंद्र विक्रेता असोसिएशन व नागरिकांनी शासनाकडे माहे ऑगस्ट/ सप्टेंबर, २०१६ वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महानंदा डेअरीने दुधाच्या दरात वाढ करण्याचा घेतलेला निर्णय

**(४३) ७६३४१ (१२-०४-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी आणि सहकारी दूध संघानी दरवाढीचा निर्णय घेतल्यानंतर महानंदा डेअरीनेही प्रतिलिटर दुधाच्या विक्रीत दरात दोन रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेत असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार ही दरवाढ मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०५-२०१७) :** (१) महानंदाने फेब्रुवारी, २०१७ मध्ये प्रति लिटर रु.२/- अशी दूध विक्री दरात वाढ केली आहे हे खरे आहे.

(२) शासनाने दि.१३ ऑगस्ट २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या प्रदत्त समिती मार्फत केवळ शासकीय दूधाचे खरेदी व विक्री दर निश्चित करण्यात येतात. सहकार क्षेत्र व खाजगी क्षेत्र त्यांच्या दुधाचे खरेदी दर व विक्री दर त्यांच्या स्तरावर निश्चित करीत असतात. त्यामुळे शासनाने याबाबत चौकशी केलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकातील व्यावसायिक महामंडळाची अतिरिक्त जागा वापरत असल्याबाबत

**(४४) ७६३६६ (१३-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकातील व्यावसायिक महामंडळाची ठरलेल्या करारापेक्षा जास्त जागा वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यावसायिकांनी केलेल्या अतिक्रमणामुळे प्रवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यावसायिक ठरलेल्या करारापेक्षा जास्त जागेचा वापर करत असल्याने शासनाचा महसूल बुडत असून आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास शासनाचा बुडत असलेला महसूल व सदर व्यावसायिकांच्या अतिक्रमणाला प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०५-२०१७) :** (१), (२) व (३) नाही.
(४) कोल्हापूर बसस्थानकातील आस्थापना मोजणी करुन दिलेल्या जागेमध्येच व्यवसाय करीत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### एस.टी.महामंडळातील भरतीत कोकणातील बेरोजगार संधीपासून वंचित राहिल्याबाबत

**(४५) ७६६१४ (१३-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात चालक आणि वाहकांची मोठया प्रमाणात कमतरता असल्याने रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबई व पालघर या सहा जिल्ह्यांमध्ये ७९२३ चालक व वाहकांच्या भरतीची जाहिरात शासनाने माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भरतीमध्ये चालक-वाहक हे एकच पद निर्माण करण्यात आल्यामुळे आणि वाहक पदाच्या उमेदवारालाही वाहकाच्या बॅचसोबत चालक म्हणून तीन वर्षापूर्वीचा परवाना सक्तीचा करण्यात आल्यामुळे कोकणातील हजारो बेरोजगार महिला-पुरुष उमेदवार या भरतीप्रक्रियेपासून वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भरती प्रक्रियेला एस.टी.महामंडळाच्या मान्यताप्राप्त कामगार संघटनांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२५-०५-२०१७) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे पर्यवेक्षकीय व घटक संवर्ग पदांमधील एकूण १४२५३ पदे भरण्याकरीता दि.०५.०१.२०१७ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसारित करण्यात आली असून त्यामध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ६ विभागांमधील चालक तथा वाहक (कनिष्ठ) या प्रवर्गातील ७९२९ पदांसाठी जाहिरात देण्यात आली आहे. चालक तथा वाहक (कनिष्ठ) या पदासाठी चालक व वाहक बॅच (बिल्ला) असणे आवश्यक असल्याची अट समाविष्ट करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस पुरेसा प्रतिसाद मिळून चालक तथा वाहक (कनिष्ठ) या पदासाठी महिलांसहित एकूण २८२७२ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे उस बेणे निकृष्ट असल्याबाबत**

**(४६) ७७१५२ (१४-०४-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे उस बेणे निकृष्ट असल्याची बाब माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उंदराने कुरतडलेल्या व कोंब नसलेल्या निकृष्ट डोळ्यांचे, कोंबावर कापर असलेले ऊस बेण्याची सर्रास लागवड करत असल्याचे आढळून आल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम पसरला आहे, हे खरे ही आहे काय,

(३) असल्यास, नगर-मनमाड राज्यमार्गावर धरमडीच्या पश्चिम बाजूला विद्यापीठाच्या कंत्राटी मजुरांकडून उसाची लागवड केली जात आहे, लागवडीपुर्वी बेणे द्रावणात बुडून घेण्याची विद्यापीठाची शिफारस असतांना प्रत्यक्षात मात्र बेण्यावर कुठल्याही प्रकारची प्रक्रिया होत नसल्याचे आढळून आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर विद्यापीठातून पारंपारिक टिपरे टक्कर पध्दतीने लागवड होत असून दोन टिपरांमध्ये पुरेसे अंतर ठेवले जात नसल्याने यातील फुटव्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उस बेण्याची गुणवत्ता सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०५-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील /क्षेत्राबाहेरील व अनुसूचित जाती उपाययोजना अंतर्गत शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याच्या योजनेबाबत**

**(४७) ७७२४७ (१४-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील /क्षेत्राबाहेरील व अनुसूचित जाती उपाययोजना अंतर्गत शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याच्या योजनेमधील सन २०१६-१७ च्या मार्गदर्शक सूचनेत बदल करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री यांना दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-०६-२०१७) :** (१) होय.

(२) अनुसूचित जाती/ नवबौध्द शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणारी विशेष घटक योजना, दिनांक ५ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये “डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना” या नावाने सुधारित करण्यात आली आहे. त्याच योजनेच्या धर्तीवर आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणारी, आदिवासी क्षेत्रातील / क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना सुधारित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यावल (जि.जळगाव) येथील जीर्ण झालेल्या बस स्थानक इमारतीचे नुतनीकरण करणेबाबत**

**(४८) ७७८३३ (१३-०४-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव) येथील बस स्थानक इमारत ४० वर्षापूर्वीची असल्याने तिची दूरावस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर इमार्तीची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार या बस स्थानकाचे नुतनीकरणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहे ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०६-२०१७) :** (१), (२) व (३) जळगांव जिल्हयातील यावल या ठिकाणी राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीच्या जागेत कायमस्वरुपी ३ गाळयांचे बसस्थानक बांधलेले आहे. सदर बसस्थानक हे ४० वर्षापूर्वीचे असून बसस्थानकाच्या वाहनतळाची पातळी व रस्त्याची पातळी एकच झालेली आहे. सदरची इमारत जुनी झालेली असल्याने इमारतीची पुनर्बांधणी करणे प्रस्तावित असून राज्य परिवहन महामंडळाच्या पॅनेलवरील तज्ञ वास्तुविशारद ‘द डिझाईन कलेक्टीव्ह’ नाशिक यांची नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्याकरीता नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघातील कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी न भरल्याबाबत

**(४९) ७७८४३ (१२-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघातील कर्मचा-यांच्या वेतनातून कपात केलेला भविष्य निर्वाह निधी (पीएफ) न भरल्याप्रकरणी चेअरमनसह १७ संचालकांवर माहे जानेवारी, २०१७ च्या दरम्यान गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबधिताविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३१-०५-२०१७) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे,

श्री. अरुण मुरलीधर दयाळ, प्रवर्तन अधिकारी, कर्मचारी भविष्य निधी संघटना उपक्षेत्रीय कार्यालय पी ११ एमआयडीसी सातपूर, नाशिक यांनी नाशिक जिल्हा दूध उत्पादक संघाचे संचालक मंडळाविरुध्द दि.१७/०१/२०१७ रोजी एमआयडीसी, सिन्नर पोलिस स्टेशन, जि. नाशिक(ग्रामीण) येथे गुन्हा दाखल केला आहे. नाशिक जिल्हा दूध उत्पादक संघांच्या १८ संचालकांविरुध्द माहे ऑक्टोबर, २०१४ ते फेब्रुवारी, २०१६ पर्यत एकूण रु.५,९७,०६३/- इतकी रक्कम कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यावर जमा न करता आप-आपसात संगनमत करुन, विश्वासघात करुन अफरातफर केली म्हणून श्री. दयाळ यांनी भारतीय दंड संहिता कलम ४०६ व ४०९ अन्वये कायदेशीर फिर्याद केली होती. परंतु फौजदारी गुन्हयात दर्शविलेली रक्कम रु.५,९७,०६३/-ही रक्कम संघाकडून दि.२३/०३/२०१७ रोजी डिमांड ड्राफ्टने सहाय्यक आयुक्त, भविष्य निर्वाह निधी, एमआयडीसी, सातपुर, नाशिक या कार्यालयात जमा केली आहे.

याबाबत संबंधिताविरुध्द पोलिसांत गुन्हा नोंद असून त्यांचेमार्फत तपास व पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना होत असलेला अपघातांबाबत

**(५०) ७८२३० (१३-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे 'एसटीचा प्रवास सुरक्षित प्रवास' हे ब्रीद वाक्य असताना गेल्या काही वर्षातील अपघातांची आकडेवारी पाहता सन २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत एकूण ७७७४ बसेसचे अपघात झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटीचे अपघात कमी व्हावे म्हणून विशेष जनजागृत्ती मोहिम राबवूनही अपघातांची संख्या कमी होत नसून या अपघातांमध्ये शेकडो प्रवाशांनी जीव गमवला असून हजारो प्रवासी जखमी झाल्याची माहिती परिवहन महामंडळाच्या जनसंपर्क विभागाकडून देण्यात आली आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, या प्रकरणांची चौकशी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०५-२०१७) :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना सन २०१४-१५ ते २०१६-१७ (डिसेंबर, २०१६ पर्यंत) या कालावधीत एकूण ८२२४ अपघात झालेले आहेत.
(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या चालकाकडून होणारे अपघात रोखण्यासाठी व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महामंडळामार्फत जानेवारी, २०१७ मध्ये विनाअपघात सुरक्षितता मोहिम राबविण्यात आली. तसेच महामंडळाद्वारे दिनाक १५.०४.२०१५ पासून राज्य परिवहन मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था येथे अपघात प्रवण चालकांना ७ दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

तसेच, मे.वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल्स असोसिएशनतर्फे दिनांक ०१.०२.२०१४ पासून एक दिवसाचे सिम्युलेटर प्रशिक्षण देण्यात येते. चालकांसाठी प्रत्येक विभागामध्ये चालकांच्या सकारात्मक मानसिकतेकरिता तज्ञ समुपदेशकाची नियुक्ती करण्यात येऊन त्यांचेव्दारे समुपदेशन केले जात आहे. त्याचप्रमाणे प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्वविद्यालयाच्या प्रशिक्षकांमार्फत आगार पातळीवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करुन चालकांना मार्गदर्शन करुन प्रबोधन केले जाते.

सन २०१४-१५ मध्ये दर लाख सार्थ कि.मी. मागे राज्य परिवहन महामंडळाचे अपघाताचे प्रमाणे ०.१५ होते ते सन २०१५-१६ मध्ये दर लाख सार्थ कि.मी. मागे ०.१३ इतके कमी झाले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.